# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ३०/११/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ३०/११/२००५ रोजी सभा सुचना क्र. १८ दि. २४/११/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ६) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ७) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ८) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ९) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १०) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ११) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १२) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १३) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १४) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| २) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, हेड ऑफ दी डिपार्टमेन्ट आणि मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे या सभेमध्ये स्वागत करतो. आपण सर्वांनी ही स्थायी समितीची सभा गुण्या गोविंदाने पार पाडावी अशी अपेक्षा करतो आणि सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी अशी मी प्र. सचिवांना सुचना करतो.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, सभा सुरु होण्यापूर्वी मी सांगू इच्छितो की आपण ठराव मांडतो, सर्व काही करतो परंतु त्याची अंमलबजावणी होते का? आपण असे ठरविलेले होते की, शाळा चालू असताना शाळेची मैदाने कोणालाही भाड्याने देऊ नये. आता माझ्या हातात एक पत्र आहे त्या पत्रामध्ये असा उल्लेख आहे की शाळा क्र.१३ चे मैदान दि. ३०/११/२००५ ते दि. १०/१२/२००५ पर्यंत हे शाळेचे मैदान भाड्याने दिलेले आहे. ही काय पध्दत आहे? शाळा बंद करा आणि हे मैदान भाड्याने द्या. म्हणजे आपल्या महानगरपालिकेला पैसे मिळतील. हे मैदान भाड्याने का देतात? तुम्हाला तिथे शाळा चालवायची आहे की, जत्रा चालवायची आहे. आपण इथे बसून हे ठराव कशासाठी करतो? आपण शाळा बंद करुया. आपण शाळेचे मैदान भाड्याने दिले तर आपल्याला पैसे मिळतील.

**जयंत पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, तुमचे ह्याच्यावर काय रुलिंग आहे?

**मा. सभापती :-**

सर्व अधिकाऱ्यांना याबाबत विचारणा करावी असे माझे रुलिंग आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही याबाबत अधिकाऱ्यांना काय विचारणार? मैदान सुट्टीच्या दिवशी भाड्याने देण्याबाबतचा आपला ठराव झालेला आहे. तसेच, त्या ठरावाची अंमलबजावणी झालेली आहे आणि तुम्ही काय सांगता?

**जयंत पाटील :-**

भाईंदर (पूर्व) ला कुठल्याही तऱ्हेचे मैदान नाही. त्या मैदानामध्ये सकाळ, संध्याकाळ बरीच लोक व्यायाम, मॉर्निंगवॉक करतात. त्या मैदानात मुले क्रिकेट खेळत असतात. असे असताना फक्त जुगार खेळण्यासाठी ते शाळेचे मैदान द्यायचे का?

**गजानन भोईर :-**

त्या मैदानात फक्त जुगार आणि झुले खेळणे चालू असते.

**जयंत पाटील :-**

मागच्या वेळेला त्याच्यावर एस.पी. ने बंदी आणलेली होती आणि त्याबाबत मी तक्रार केलेली होती. लोकांचे पगार जुगारामध्ये जातात आणि आपण त्यांना साथ देतो असा त्याचा अर्थ होईल.

**गजानन भोईर :-**

आता तसाच प्रकार घडलेला आहे. शाळेची मुले पैसे आणून त्या मैदानात जूगार खेळतील. शाळेत जाणार नाहीत.

**जयंत पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, तुम्ही तिथे राहत नाहीत. मी तिथे बाजूलाच राहतो. आम्हाला रात्रीच्या वेळेला त्या गोष्टीचा त्रास होतो. तिथे अतिशय प्रचंड प्रमाणात आवाज येतो. दुसऱ्या दिवशी दिवसभर जुगार खेळला जातो. समोर शाळा असल्यामुळे आपण त्या शाळेच्या विद्यार्थ्यांना ट्रेनिंग देतो असा अर्थ होईल. आपण या ठिकाणी या देशाचे नागरिक तयार करीत आहोत त्यामुळे असे करणे योग्य नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण या ठरावात हे शाळेचे मैदान मेळेवाल्यांना देण्याचा उल्लेख केलेला नाही. आपण ते मैदान मेळेवाल्यांना द्यायचे नाही.

**गजानन भोईर :-**

आपण ते मैदान मेळेवाल्यांना द्यायचे नाही असे सांगितले होते. आपण ते मैदान मेळेवाल्यांनासुध्दा द्यायचे नाही आणि शाळा चालू असतानासुध्दा भाड्याने द्यायचे नाही.

**जयंत पाटील :-**

त्या मैदानात जुगार अजिबात लावायचा नाही.

**शरदचंद्र बेलवटे :-**

शाळा चालू असताना शाळेचे मैदान भाड्याने देण्याचा प्रश्न येत नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, या मिटींगला शिक्षण अधिकारी हजर नाहीत.

**गजानन भोईर :-**

आपल्या सभेसाठी सगळे अधिकारी हजर पाहिजेत. तुम्ही प्रथम सगळ्या अधिकाऱ्यांना बोलवा.

**जयंत पाटील :-**

प्रथम या विषयावर रुलिंग द्या आणि नंतर सभा चालू करा.

**गजानन भोईर :-**

तुम्ही या विषयावर रुलिंग द्या आणि नंतर सभा चालू करा. सगळ्या प्रभाग अधिकाऱ्यांनी किंवा महानगरपालिकेने त्यांना मैदान भाड्याने देण्याबाबत अधिकार दिलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

तुम्ही ते मैदान कुठल्या कामासाठी दिलेले आहे ते प्रथम सांगा.

**गजानन भोईर :-**

आम्ही हे मैदान जत्रोत्सवासाठी भाड्याने दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

जत्रोत्सव म्हणजे ते मैदान जत्रेमध्ये झुले आणि जुगार खेळण्यासाठी भाड्याने दिले आहे का?

**गजानन भोईर :-**

त्यांनी या ठिकाणी असा उल्लेख केलेला आहे की, उपरोक्त विषयानुसार असे देऊन महानगरपालिका क्षेत्रात नवघर शाळा भाड्याने देण्याबाबत. कोकणप्रेमी मित्रमंडळ जत्रोत्सव यांनी ते मागितलेले आहे. त्याला त्या लोकांनी काही अटी दिलेल्या आहेत. या अटीवर तुम्ही ते मैदान भाड्याने घ्या असे त्यांचे म्हणने आहे. मी त्यांच्या अटी वाचतो. मैदानात कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही, सदरची परवानगी दिलेल्या वेळेनुसार असणे आवश्यक राहील, इतर शासकीय परवाना घेण्याची जबाबदारी आपली राहील, महानगरपालिकेस सदनाची गरज असल्यास किंवा नागरिकांची तक्रार असल्यास रद्द केले जाईल, स्टॉलचे भाडे जवळजवळ रु. १००/- आहे. मग आपण हे मैदान कशासाठी भाडयाने देतो? तेच मला कळत नाही. असे असेल तर आपण शाळा बंद करु.

**कैलासबेन जानी :-**

ते शाळेचे मैदान शाळा बंद असताना भाड्याने द्यायला पाहिजे. तुम्ही ते मैदान शाळा चालू असताना भाड्याने कसे दिले?

**गजानन भोईर :-**

तुम्ही ह्याच्यावर रुलिंग द्या. हे मैदान भाड्याने द्यायचे की काय करायचे ते सांगा.

**कैलासबेन जानी :-**

ज्यांनी हे मैदान भाड्याने दिलेले आहे. त्यांची या ठरावावर सही असेल.

**गजानन भोईर :-**

ते शाळेचे मैदान प्रभाग अधिका-यांनी भाड्याने दिलेले आहे.

**कैलासबेन जानी :-**

ते शाळेचे मैदान प्रभाग अधिका-यांनी भाड्याने दिलेले असल्यामुळे आपण काय बोलणार? माझ्या मते त्या प्रभागाचे प्रभाग अधिकारी श्री. केसरीनाथ म्हात्रे हे आहेत.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, आपले शिक्षण अधिकारी शाळेच्या उद्‌घाटनाला गेलेले आहेत. सकाळी १२.३० वाजताचे उद्‌घाटन होते आणि आता ११.३० वाजलेले आहेत. त्यांना उद्‌घाटन जास्त महत्वाचे वाटते की आपली मिटींग जास्त महत्वाची वाटते.

**मोहन पाटील :-**

परंतु त्यांचा विषय या विषयपत्रिकेवर नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

या विषयपत्रिकेवर शिक्षण अधिका-यांचा विषय नसला तरी त्यांचा विषय निघु शकतो.

**मोहन पाटील :-**

या ठिकाणी शिक्षण विभागाचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. परंतु, ज्यावेळेला त्या अधिका-याचा विषय विषयपत्रिकेवर असेल तेव्हा ते अधिकारी आलेच पाहिजेत.

**धृवकिशोर पाटील :-**

शिक्षण अधिकारी कधीही जागेवर भेटत नाहीत. कुठल्याही सन्मा. सदस्याने हे शिक्षण अधिकारी जागेवर भेटतात की नाही ते सांगावे. ते कधीच जागेवर भेटत नाहीत. मा. सभापतीसाहेब, तुम्ही सगळ्या अधिका-यांना बोलवा. कुठल्याही अधिका-याबाबत कुठलाही विषय कधी निघेल हे सांगता येत नाही.

**जयंत पाटील :-**

ते मैदान कधीपर्यंत भाड्याने दिलेले आहे?

**गजानन भोईर :-**

ते मैदान १० तारखेपर्यंत भाड्याने दिलेले आहे असे मला वाटते.

**जयंत पाटील :-**

त्यांना पावती दिलेली आहे का?

**कैलासबेन जानी :-**

तो कार्यक्रम सात दिवसांचा आहे.

**जयंत पाटील :-**

श्री. खांबित साहेब, ते मैदान तुम्ही भाड्याने देणार होतात. मग तुम्ही त्यांना पावती दिली का?

**दिपक खांबित :-**

नाही.

**जयंत पाटील :-**

मग ही पावती कोणी दिली?

**दिपक खांबित :-**

प्रभाग अधिकारीमार्फत ही पावती दिली जाते.

**सुर्यकांत भोईर :-**

प्रभाग अधिकारी आणि सर्व अधिकारी मिटींगला हजर हवेत. म्हणजेच प्रत्येक डिपार्टमेन्टचे अधिकारी मिटींगला हजर हवेत.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, आता टॅक्सच्या पावत्या पूर्णपणे वाटलेल्या नाहीत. अर्ध्या वाटलेल्या आहेत आणि अर्ध्या अशाच आहेत.

**गजानन भोईर :-**

आपल्याला तो विषयसुध्दा घ्यायचा आहे.

**एस. ए. खान :-**

त्याच्यामध्ये मागच्या वेळेला ज्यांनी टॅक्स भरलेला होता त्यांनासुध्दा नोटिस वगैरे लागलेली आहे. आणि ज्यांनी नंतर टॅक्स भरलेला होता त्यांनासुध्दा नोटिस लागलेली आहे. मागच्या वेळेला ज्या लोकांनी बिल

भरलेले होते, त्यांनासुध्दा पुन्हा नोटिस देण्यात आली आणि नेटिसचे पेपर पुन्हा वाटण्यात आले. कर्मचाऱ्यांचा वेळ फुकट गेला. यावेळेला ज्या लोकांनी अगोदर टॅक्स भरलेला आहे त्यांनासुध्दा नोटिस फी लावण्यात आलेली आहे. आमच्या मिरारोडमध्ये मोठे मोठे कॉम्प्लेक्स आहेत. त्या मिरारोड कॉम्प्लेक्समधील सगळे लोक आमच्याकडे येतात आणि सांगतात की आम्ही टॅक्स वेळेवर भरलेला आहे. तरीसुध्दा आम्हाला नेटिस फी का लावली? मा. सभापतीसाहेब, तुम्ही प्रथम अधिकाऱ्यांना बोलवा. ते टॅक्स बिल तयार केलेल्या चुकीची दुरुस्ती करुन नंतरच बिल पाठवा. जोपर्यंत मिरारोडची टॅक्स बिलची दुरुस्ती होणार नाही तोपर्यंत आम्ही टॅक्स भरणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, आम्ही दोन वर्षापूर्वी जे रु. ५००/- चे बिल ट्रान्सफर केलेले होते, ते जसेच्यातसे आहे. आपल्या पालिकेने रु. ५००/- घेतलेले आहेत. परंतु, नावाची नोंद अजूनपर्यंत झालेली नाही.

**एस. ए. खान :-**

माझ्या प्रभागातसुध्दा रु. ५००/- घेऊनसुध्दा अजूनपर्यंत नावाची नोद झालेली नाही. साहेब, तुम्ही आमची तक्रार ऐकून घ्या.

**मोहन पाटील :-**

तुमचा विषय आत चालू आहे.

**एस. ए. खान :-**

आमचा विषय चाललेला आहे हे बरोबर आहे. परंतु, माझी तक्रार ऐकून घ्या. तुम्ही आमची तक्रार ऐकून घेत नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य एस. ए. खान आणि सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील जे विषय सांगत आहेत, ते दोन्ही सारखे विषय आहेत.

**गजानन भोईर :-**

आमचा विषय शाळेचे मैदान भाड्याने देणेबाबतचा आहे. या विषयाशी जे संबंधित अधिकारी आहेत त्यांना बोलावण्यात यावे.

**मोहन पाटील :-**

शाळचे मैदान भाड्याने देण्याची जबाबदारी प्रभाग अधिकाऱ्यांची आहे. शिवाय हा विषय मुख्यालयाच्या आखत्यारितील आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

तुम्ही अधिकाऱ्यांना आता बोलवा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

तुम्ही हा विषय मुख्यालयाच्या आखत्यारितील आहे असे बोलता. ह्या विषयावर मुख्यालयाचे नियंत्रण आहे.

**गजानन भोईर :-**

परंतु, शाळेचे मैदान भाड्याने देण्याची परमिशन तुम्ही दिलेली आहे. आता मी बोलतो की मला ते शाळेचे मैदान भाड्याने पाहिजे. जर तुम्ही देत असाल तर द्या. मी त्याचे महिनाभरचे भाडे द्यायला तयार आहे. तुम्ही मला या विषयावर रुलिंग द्या.

**रतन पाटील :-**

नवघर शाळेचे मैदान शाळा चालू असताना कुठलाही कार्यक्रम होऊ देऊ नये असा ठराव झालेला आहे.

**मोहन पाटील :-**

आपण मैदान भाड्याने देण्याबाबत ठरवतो किंवा आपण एखादे मैदान भाड्याने देतो तेव्हा त्या मैदानात त्या फेरीवाल्यांचे  काऊन्टर लागतात. कुठलीही शाळा ह्या मैदानातील काऊन्टर काढू शकत नाही आणि सुट्टीच्या दिवसात तर बिलकुल नाही. त्यांचे काऊन्टर तिथे लावलेले असतात. त्या फेरीवाल्यांची दुकाने तिथे चालू असतात. आपण ते काढू शकत नाही. शाळेच्या सुट्टीच्या दिवसात ते काऊन्टर संध्याकाळी चालू असतात. जर शाळेच्या सुट्टीच्या दिवशी असे काऊन्टर काढता येणार नाहीत. परंतु, आपल्याला त्याच्यावर विचार करावा लागेल.

**कैलासबेन जानी :-**

जर शाळेच्या मैदानाबाबतचा ठराव दिला असेल तर तो ठराव प्रभाग अधिकाऱ्यांकडे पाठवावा.

**गजानन भोईर :-**

नवघर शाळेबाबतचा ठराव झालेला आहे.

**जयंत पाटील :-**

नवघर शाळेचे मैदान भाड्याने देण्याबाबतचा ठराव रद्द करा.

**गजानन भोईर :-**

नवघर शाळेचे मैदान भाड्याने देण्याबाबतचा ठराव रद्द करा. ह्याच्यापुढे नवघर शाळेचे मैदान भाड्याने देऊ नये.

**रतन पाटील :-**

साहेब, जन्म-मृत्यु दाखल्याविषयीचा विषयसुध्दा महत्वाचा आहे. आपली कॉम्प्युटर व्यवस्था सुरळीत चालू राहीली तर आपल्याला दाखल्याची सोय चांगल्याप्रकारे होणार आहे.

**दिपक खांबित :-**

आपले काम मार्च, एप्रिल महिन्यातच जास्त असते.

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी अतिशय चांगला प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपण जो कक्ष उभारलेला आहे. आपण त्याच्यासाठी जवळजवळ रु. २ कोटी ते रु. ३ कोटीपर्यंत खर्च केलेला आहे. पूर्वी त्या संगणक कक्षाचा चार्ज श्री. माशालकर सांभाळत होते. परंतु, श्री. माशालकर जाऊन पाच-सहा महिने झालेले आहेत. आज त्या कक्षाचा कारभार बघायला एकही अधिकारी नाही. संगणक कक्षातुन जुनीच बिले निघाली जात आहेत आणि ती बिले तशीच दिली जात आहेत. एखादा अधिकारी बिल घेऊन येतो तर त्याची नोंद करायला पाहिजे की नको? सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील यांची दोन बिले होती. ती अधिकाऱ्यांनी लिहायला पाहिजे की नको? याचे उत्तर तुम्ही श्री. विजय पाटील यांना विचारा. कारण ते टॅक्सचे बिल होते.

**गजानन भोईर :-**

महापालिकेचा कारभार कधीच परिपूर्ण होत नाही.

**केशव घरत :-**

तुम्हाला संगणक कक्षावर अधिकारी नेमायला पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

संगणक कक्षात कॉम्प्युटर सिस्टीम मॅनेजर नाही.

**गजानन भोईर :-**

आपण एवढा रु. अडीच कोटीचा केलेला खर्च पाण्यात गेलेला आहे.

**केशव घरत :-**

हा खर्च पाण्यात गेला असेच म्हणावे लागेल.

**गजानन भोईर :-**

प्रथम तुम्ही माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या की, तुम्ही नवघर शाळेचे मैदान शाळा चालू असताना भाड्याने देणार आहात का?

**धृवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर, शाळेचे मैदान भाड्याने घेण्याचा अधिकार मा. सभापतींना नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मैदानाबाबत रुलिंग देण्याचा अधिकार मा. सभापती साहेबांना का नाही?

**धृवकिशोर पाटील :-**

एखादे परमिशन देण्याचा अधिकार स्थायी समितीचा आहे. मा. सभापतींना नाही.

**मा. सभापती :-**

कुठल्याही ठिकाणी एखादी परमिशन दिली तर ती रद्द करु शकत नाही.

**गजानन भोईर :-**

या मैदानाच्या परमिशनबाबत पूर्वी ठराव झालेला आहे.

**मा. सभापती :-**

जर अधिकाऱ्यांना या परमिशनबद्दल योग्य प्रकारे माहिती नसेल तर तुम्ही त्याबाबत अधिकाऱ्यांना कळवा.

**मोहन पाटील :-**

समजा, एखादे रुलिंग दिले असेल किंवा एकदा रुलिंग दिल्यानंतर प्रशासन त्याच्यावर कार्यवाही करु शकते.

**गजानन भोईर :-**

ते सर्व अटींमध्ये नमुद केलेले आहे.

**कैलासबेन जानी :-**

त्या अधिकाऱ्यांनी ते मैदान भाड्याने कसे दिले? तुम्ही त्या अधिकाऱ्यांना फोन करुन बोलवा. त्यांनी कोणाच्या दबावाखाली ते मैदान भाड्याने दिलेले आहे का? ते माहिती पडू द्या.

**गजानन भोईर :-**

अट क्र.७ मध्ये लिहलेले आहे की, मंडप उभारल्यानंतर नगरसेवक, नगरसेविकांच्या तक्रारी आल्यास सदर परवानगी रद्द केली जाईल. परंतु, स्थायी समिती हे विचारत घेत नाही.

**मा. सभापती :-**

प्रत्येक वेळेला असा कलम टाकावा लागतो.

**जयंत पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, जो विषय चाललेला आहे, त्याच्यावर बोला. तुम्ही ह्याच्यापुढे नवघर शाळेचे मैदान भाड्याने देऊ नका. मा. सभापती साहेब, तुम्ही पीठासीन अधिकारी आहात. त्यामुळे तुम्ही बोला.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, नवघर शाळेचे मैदान भाड्याने देता येत असेल तर ते मैदान भाड्याने देता येईल असे रुलिंग द्या.

**रतन पाटील :-**

जर आपण नवघर शाळेचे मैदान भाड्याने दिले तर त्याचा आपल्या महापालिकेला फायदा होईल. कारण त्याच्यामुळे आपल्या महापालिकेचे उत्पन्न वाढेल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही शाळाच बंद करा. कारण तुम्ही ते मैदान भाड्याने देण्याचे थांबवणार नाही. महापालिकेला उत्पन्न वाढेल हा एक वेगळा भाग आहे. परंतु, मी त्या प्रभागाचा नगरसेवक आहे. ह्याच्यामधील मुळ राजकारण मला माहिती आहे. नवघर शाळा भाड्याने देण्याबाबत माझा विरोध आहे.

**मोहन पाटील :-**

आताच सन्मा सदस्य धृवकिशोर पाटील यांनी सांगितले की परमिशन देण्याबाबतचा अधिकार स्थायी समितीच्या मा. सभापतींना नाही. त्यामुळे प्रशासनाची एक प्रमुख भुमिका म्हणून आपण या विषयावर चर्चा करण्यासाठी मा. आयुक्त साहेबांना बोलवूया. म्हणजे या विषयावर व्यवस्थितपणे चर्चा होईल.

**गजानन भोईर :-**

मा. आयुक्तसाहेब आल्यावर प्रथम माझ्या विषयावर निर्णय द्या.

**केशव घरत :-**

साहेब, प्रथम श्री. माशाळकरांच्या जागेवर कुठल्या अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे? ते मला सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या संगणक कक्षामध्ये सिस्टिम मॅनेजर आणि सॉफ्टवेअर इंजिनियर नाहीत. हीसुध्दा एक दुर्देवाची बाब आहे. परंतु, आता श्री. माशाळकर गेलेले आहेत. त्यांच्या जागी कोणाला नेमले? तेसुध्दा स्पष्ट करा.

**केशव घरत :-**

आता संगणक कक्षामध्ये एकही अधिकारी नाही. त्यामुळे कर संकलक व निर्धारकचे अधिकारी श्री. विजय पाटील यानांच विचारा. ज्यांनी बिले भरलेली आहेत त्यांना तीन बिले आलेली आहेत आणि ज्यांनी बिले भरली नाहीत त्यांना एकही बिल दिलेले नाही.

**गजानन भोईर :-**

श्री. विजय पाटील तुम्ही तुमची अडचण सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या संगणक विभागामध्ये किंवा आपल्या कुठल्या डिपार्टमेन्टमध्ये स्टाफ कमी आहे का?

**विजय पाटील :-**

आमचा स्टाफ बरोबर आहे. परंतु, संगणक विभागात काही तांत्रिक अडचण आल्यामुळे असे घडले असेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण श्री. माशाळकर यांना नेमुन चूक केलेली आहे. श्री. विजय पाटील साहेब, मी गेल्या वेळेला तुमच्याकडे एक प्रकरण आणलेले होते मी जवळजवळ दोन वर्षापूर्वी हे प्रकरण आणलेले होते. परंतु, तुम्ही त्याचा टॅक्स ट्रान्सफर केलेला होता. ते प्रकरण अजूनपर्यंत जसेच्या तसे आहे. त्याच्यामध्ये जो बदल करायला पाहिजे होता तो बदल झालेला नाही.

**विजय पाटील :-**

आम्ही गेल्या वर्षी चूक दुरुस्ती करण्यासाठी श्री. माशाळकर साहेबांकडे दिलेले होते. परंतु, ते झालेले नाही. मी काही तांत्रिक कर्मचारी नाही. त्यामुळे मला त्याच्यामधील काही माहिती नाही.

**गजानन भोईर :-**

.मग याचे उत्तर श्री. पानपट्टे साहेब देतील. साहेब, जे कल्याण डोबिंवलीचे सॉफ्टवेअर आणलेले आहेत ते परिपूर्ण आहेत का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जे आणलेले होते ते मॉडम आहेत.

**गजानन भोईर :-**

ते संगणक विभागात कोणी ठेवले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते सॉफ्टवेअर ठराव करुन ठेवलेले आहेत.

**गजानन भोईर :-**

जर काही प्रॉब्लम असेल तर आम्हाला सांगा. आम्ही तसा विषय आणतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सिस्टिम मॅनेजर आणि सॉफ्टवेअर इंजिनियरची पदे रिक्त आहेत. जोपर्यंत ही पदे मंजूर होणार नाहीत तोपर्यंत आपल्याला या पदावर कोणाचीही नियुक्ती करता येणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग आपण तोपर्यंत अशा चुका करायच्या का?

**गजानन भोईर :-**

ह्याच्यापूर्वी सी.एफ.सी. मध्ये बरोबर काम चालत होते. बिले व्यवस्थित जात होती. तशीच सिस्टिम चालू ठेवा. नंतर तुम्हाला ही पदे जेव्हा भरायची तेव्हा भरा.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. पानपट्टे साहेब, सन २००३ ची बिले करेक्शन करुन दिलेली आहेत.

**गजानन भोईर :-**

एकतर तुमचे बिल पंधरा दिवस अगोदर तयार असते. आम्ही मागच्यवेळेला बिल मागायला आलो तर तुमच्याकडे ते पेपर नव्हते. जवळजवळ दोन लाख पेपर मिळालेले नाहीत. आता तुम्ही लोकांना डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी महिन्याचे बिल भरण्यासाठी नोटिस देणार आहात. तुम्ही पहिल्यापासून बिलाची पाहणी व्यवस्थित का करीत नाहीत. आम्ही याबाबत मा. आयुक्तसाहेबांना दोन वेळा प्रस्ताव दिलेला आहे.

**मोहन पाटील :-**

तुमची जी काही बिले आहेत, त्या बिलामध्ये दुरुस्ती करण्यात येईल.

**विजय पाटील :-**

ज्यांनी डबल टॅक्स भरला असेल त्यांना पुन्हा टॅक्स लागणार नाही. मी याबाबत दक्षता घ्यायला सांगतो.

**मोहन पाटील :-**

आपल्याला संगणकाची रिक्त पदे भरायची आहेत आणि त्याबाबत प्रस्तावदेखील करायचा आहे.

**गजानन भोईर :-**

आता विषय आलेला आहे तर शाळेसाठी अनुदानाचा विषयसुध्दा घ्या.

**रतन पाटील :-**

तुम्ही नवघर शाळेचे मैदान भाड्याने देण्याचे आठ दिवसात चालू करा. जेणेकरुन महापालिकेचे उत्पन्न वाढेल. नाहीतर तुम्ही महापालिकेचे नुकसान करीत आहात असा अर्थ होईल. तुमचे महापालिकेच्या उत्पन्नावर लक्ष नाही.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४६ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

आमचे पान क्र. ८ हे कोरे आहे.

**मोहन पाटील :-**

आपला मागच्या मिटींगमध्ये रिक्त पदे भरण्याचा ठराव झाला होता. त्याचे इम्प्लिमेन्टेशन झालेले दिसत नाही. तो ठराव काय केलेला आहे. ते बघून त्याच्यावर इम्प्लिमेन्टेशन करण्यांत यावे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जोपर्यंत पदे मंजूर होणार नाहीत तोपर्यंत आपल्याला ही पदे आपल्याला भरुन घेता येणार नाहीत. जर या ठरावात करेक्शन करायचे असेल तर ते करुन घ्या.

**मोहन पाटील :-**

माझ्या मते हा ठराव पुन्हा घेण्यात यावा.

**दिपक खांबित :-**

हा ठराव पुन्हा घेताना ह्याच्यामध्ये करेक्शन करुनच ठराव पुन्हा घ्यावा.

**मा. सभापती :-**

आपल्याला जर टेम्पररी स्वरुपात कर्मचारी घेता येत असतील तर टेम्पररी स्वरुपात कर्मचारी घ्या.

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे त्याचा ठराव आहे.

**गजानन भोईर :-**

आजची मिटींग जाऊ दे. परंतु, तुम्ही पुढच्या मिटींगला नविन ठराव घ्या.

**मोहन पाटील :-**

तुमचे म्हणणे असेल तर आपण नविन ठराव घेऊ या.

**गजानन भोईर :-**

आपली कॅन्टीनबाबत चर्चा झालेली नाही. त्यामुळे या विषयावर चर्चा करण्यासाठी तुम्ही लगेच मिटींग लावा. कारण आपल्याला कॅन्टीनबाबतचे पैसे मागायला एक दोन महिने बाकी आहेत. मला एक समजत नाही की, तुम्ही कॅन्टीनमध्ये जो धुरांडा लावलेला आहे तो कशाचा लावलेला आहे? कारण ज्या धुरांड्याला रु. सव्वा दोन लाखापर्यंत खर्च येतो, त्याला रु. सव्वा दहा लाखापर्यंत खर्च आलेला आहे. तुम्ही तो धुरांडा सोन्याचा बनविला आहे की, त्या धुरांड्याला सोन्याचा मुलामा दिलेला आहे हेच मला समजत नाही. त्या धुरांड्याबाबतचा पत्रव्यवहार झालेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, मी टॉवर्सवर कर आकारणी करणेबाबतचा विषय दिलेला होता. मी त्याबाबत तुम्हाला पत्रव्यवहारसुध्दा केलेला होता. मी तुम्हाला त्याबाबत एक पत्र दिलेले आहे. तुम्ही हा विषय विषयपत्रिकेवर घ्यावा या आशयाचे ते पत्र आहे. परंतु, तुम्ही हा विषय विषयपत्रिकेवर घेतला नाही. तुम्हाला या विषयाची गरज वाटली नाही का?

**मा. सभापती :-**

आम्हाला या विषयाची गरज वाटली नाही असे नाही.

**रतन पाटील :-**

मग तुम्ही हा विषय विषयपत्रिकेवर का घेतला नाही? मा. सभापतीसाहेब, तुम्ही मला याचे निवेदन करा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, तुम्ही विषय दिलेला आहे आणि आम्ही तो विषय विषयपत्रिकेवर आणायला पाहिजे होता हे तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**रतन पाटील:-**

हा विषय महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. महापालिकेचे उत्पन्न घटत आहे. त्यामुळे तुम्ही हा विषय उशीरा आणू नका.

**गजानन भोईर :-**

आजच्या स्थायी समितीच्या सभेत मा. आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड सो. हे पहिल्या वेळेला हजर राहिल्यामुळे आपण त्यांचे अभिनंदन करुया आणि मी त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**प्रकरण क्र. १४६ :-**

दि. २६/०७/२००५ व दि. ३१/०८/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १५० :-**

दि. २६/०७/२००५ व दि. ३१/०८/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४७ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**केशव घरत :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १४७ :-**

जुन्या इमारती लिलाव पद्धतीने तोडण्यास मंजूरी देणे.

**ठराव क्र. १५१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने खालील इमारती नविन बांधण्याचे प्रस्ताव पारीत केलेले असून ठेकेदारांना कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आह. सदर नविन कामे सुरु करण्यापुर्वी जून्या इमारती तोडाव्या लागणार आहेत. सदर जुन्या इमारतीचे मुल्य खालीलप्रमाणे होत आहे.

| अ.क्र. | जुन्या इमारतीचे नांव | मुल्यांकन |
|---|---|---|
| १ | चेणागांव येथिल जुनी शाळागृह इमारत | रु. २०,०००/- |
| २ | मुर्धा शाळागृह इमारत | रु. ३५,०००/- |
| ३ | मिरा-गांव येथिल वॉर्ड ऑफीस | रु. १२,०००/- |

वरीलप्रमाणे रक्कम महानगरपालिकेच्या खात्यात जमा करुन शाळागृहाच्या जुन्या इमारती तोडणेंस व नविन इमारत बांधून पूर्ण होई पर्यंत शाळेचे कामकाज सुरळीत सुरु राहणेसाठी इतरत्र व्यवस्था करावी लागणार असून खालीलप्रमाणे पर्याची व्यवस्था करण्यांत यावी.

| अ.क्र. | नविन शाळागृह इमारत बांधावयाच्या शाळागृहाचे नांव | नियोजित पर्यायी व्यवस्था |
|---|---|---|
| १ | चेणागांव येथिल जुनी शाळागृह इमारत | मौजे चेणांगाव येथिल श्री. शंकर जी. वेलकर यांच्या मालकीच्या तीन इमारती मध्ये व्यवस्था शक्य आहे. |
| २ | मुर्धा गांव येथिल जुनी शाळागृह इमारत | मुर्धागांव येथिल महानगरपालिकेचे भव्य नाट्य स्टेज मध्ये पार्टीशन व मागील बाजूस तारपत्रीचे मंडप घालून व्यवस्था शक्य आहे. |

तरी वरील रक्कमे प्रमाणे जाहिर लिलाव करुन इमारती तोडून घेण्यास तसेच पर्यायी व्यवस्था करण्यास व येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४८ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. मोहन पाटील ह्यांनी ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**कैलासबेन जानी :-**

या सेवेत बाकीच्या लोकांनासुध्दा समाविष्ठ करुन घेण्यात यावे.

**रतन पाटील :-**

साहेब, ह्या प्रकरणामध्ये ज्या काही सुविधा आहेत, त्या सुविधा अगोदर द्यायला पाहिजे होत्या. ह्या लोकांनी या सुविधा देण्यासाठी एवढा उशीर का केला? तेच कळत नाही. आपल्याला माहिती आल्यावर आपण एक महिन्यामध्ये त्या लोकांना आपल्या सेवेत समाविष्ठ करुन घ्यायला पाहिजे होते. त्याबाबत जो पत्रव्यवहार व्हायला पाहिजे होता, तो पत्रव्यवहार झालेला दिसत नाही. मा. सभापती साहेब, तुम्ही याबाबत खुलासा करावा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ह्याबाबत जे कागदपत्र लागते, ते प्राप्त होण्यासाठी याच्यामध्ये विलंब झाला.

**रतन पाटील :-**

परंतु, एवढा उशीर योग्य नाही. तुम्ही त्या लोकांना प्रोव्हिडन्ड फन्ड दिलेला आहे का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

कागदपत्रांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर महापालिकेने कार्यवाही केली.

**धृवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्याबाबत संबंधित डिपार्टमेन्टला विचारा. त्यांच्याकडे माहिती उपलब्ध असेल.

**रतन पाटील :-**

त्या लोकांचा प्राव्हिडन्ड फंड त्यांना दिलेला आहे असे तुम्हाला या विषयाबाबत वाटते का?

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांचा ठराव झालेला आहे आणि तुम्ही आता सांगता की, हा प्रश्न घ्या. जर तुम्हाला या विषयाची काळजी होती तर तुम्ही हा विषय का आणला? तुम्ही असे प्रकरण त्याची पुर्तता करण्यासाठी का आणले?

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, आम्हाला तुमच्याकडून उत्तर नको आहे. आम्हाला मा. सभापती साहेबांकडून प्रश्नाचे उत्तर हवे आहे. आम्हाला मा. सभापती साहेब उत्तर देतील.

**मा. सभापती :-**

आम्ही हा विषय या ठिकाणी घेतला तरी आम्ही हा विषय घेतला असे तुम्ही म्हणत नाही. सन्मा. सदस्य रतन पाटील, आम्हाला या विषयाची जेवढी माहिती पाहिजे तुम्ही तेवढी माहिती घ्यायला सक्षम आहात.

**रतन पाटील :-**

या विषयाला दोन वर्ष उशीर झालेला आहे. तुम्ही हा महत्वाचा विषय म्हणून कधी प्रस्ताव दिलेला आहे का?

**मोहन पाटील :-**

हा विषय महत्वाचा आहे. म्हणून आम्ही हा विषय आता घेतलेला आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही त्या कर्मचाऱ्यांचा प्रोव्हिडन्ड फंड दिलेला आहे का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

या कर्मचाऱ्यांचा प्रोव्हिडन्ड फंड दिलेला आहे. हे प्रोव्हिडन्ड वगैरे गोष्टी देण्यामध्ये कागदपत्र द्यायला उशीर झालेला आहे. आम्ही आवश्यक ती कागदपत्रे दिल्यानंतर तुमच्या माहितीसाठी डॉक्युमेन्टरी एव्हिडन्ट दाखवतो. परंतु, त्या कर्मचाऱ्यांचा प्रोव्हिडन्ड फंड दिलेला आहे. त्या कर्मचाऱ्यांबाबतची कुठलीही गोष्ट महानगरपालिकेकडे पेन्डीग नाही.

**रतन पाटील :-**

आम्हाला एवढ्याच खुलाश्याची आवशक्ता होती.

**जयंत पाटील :-**

मा. अध्यक्ष महाशय, प्रकरण क्र.१४८ वारसा/अनुकंपा पध्दतीने महानगरपालिका सेवेत घेण्याबाबत. तुम्ही हा विषय या ठिकाणी आणलेला आहे. आज या ठिकाणी मा. आयुक्त साहेब, स्थायी समितीला पहिल्यांदा आलेले आहेत. आपल्याला एक धोरणात्मक निर्णय घ्यायचा आहे. आपल्या स्थायी समितीमध्ये असे धोरणात्मक निर्णय घेणारे अधिकारी आहेत का? आपल्याला या ठिकाणी धोरण ठरवायचे आहे. हे धोरण स्थायी समिती कशी ठरविणार? हा विषय महानगरपालिकेकडे यायला पाहिजे. कर्मचाऱ्यांबाबतचा विषय आपल्या महापालिकेत पहिल्यांदा आलेला आहे. महापालिकेत या विषयावर योग्य निर्णय घेतला जावा.

**केशव घरत :-**

हा विषय स्थायी समितीला आलेला आहे.

**जयंत पाटील :-**

हा विषय महापालिकेत आलेला नाही. आम्हाला या विषयावर धोरणात्मक निर्णय ठरवायचा आहे.

**मा. आयुक्त :-**

हा धोरणात्मक निर्णय नाही.

**केशव घरत :-**

मला या ठिकाणी माझा एक प्रश्न मांडायचा आहे. माझा विषय भाविक कॅटररर्सच्या दरासंबंधी आहे. तो विषय घेतलेला नाही.

**प्रकरण क्र. १४८ :-**

वारसा / अनुकंपा पद्धतीने महानगरपालिका सेवेत घेणेबाबत.

**ठराव क्र. १५२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मयत कर्मचारी श्री. नित्यानंद मुरुगन हरिजन हे महानगरपालिका आस्थापनेवर सफाई कामगार म्हणून दि. १/७/१९८९ पासुन कार्यरत होते. त्यांचे दि. ३१/३/२००५ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पत्नी श्रीम. कुमारीसेल्वी नित्यानंद हरिजन यांनी वारसा पद्धतीने महानगरपालिका सेवेत घेण्याची विनंती केली आहे. तसेच श्री. मदन प्रकाश सागवान हे सफाई कामगार म्ळणून दि. १/१२/१९८७ पासून महानगरपालिका सेवेत होते. त्योच दि. २४/९/२००४ रोजी निधन झाले आहे. त्यांची पत्नी श्रीम. राणी मदन सागवान, महानगरपालिका सेवेत घेण्याची विनंती केली आहे. श्री. मोहन चौहान हे महानगरपालिका आस्थापनेवर कायम सफाई कामगार म्हणून दि. १/६/१९९० पासून कार्यरत आहेत. त्यांचे दि. ५/५/२००४ रोजी निधन झाले आहे. त्यांची पत्नी श्रीम. शोभा मोहन चौहान यांनी महानगरपालिका सेवेत घेण्यांत यावे अशी विनंती केली आहे.

शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २२९२/१९९९/प्र.क्र.१६४/९२, नवि-६, दि. ५/११/१९९२ नुसार वारसा पद्धत हि प्रामुख्याने घाण काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी लागू असून त्यांची आर्थिक परिस्थिती सुद्धा सबळ नसते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना नोकरीची व राहण्याची शाश्वती मिळणे अत्यंत आवश्यक आहे. असे कर्मचारी सेवा निवृत्त किंवा गंभीर आजारामुळे शारीरिक दृष्ट्या अपंग किंवा विकलांग झाल्या किंवा सेवेत असतांना दिवंगत झाल्यास वारस पद्धतीचा अवलंब करुन त्यांनी नामनिर्देशित केलेल्या वारसात किंवा जवळच्या नातेवाईकास सेवेत घेता येईल. वरील कर्मचाऱ्याबाबत या पद्धतीचा अवलब करुन त्यांचे वारस अनुक्रमे १) श्रीम. कुमारीसेल्वी नित्यानंद हरिजन, २) श्रीम. राणी मदन सागवान, ३) श्रीम. शोभा मोहन चौहान यांना वारसा पद्धतीने सफाई कामगार म्हणून रु. २५५०-३२०० या वेतनश्रेणीत महानगरपलिका सेवेत घेता येईल.

अशा पद्धतीने या अगोदर महानगरपालिका सेवेतील सेवानिवृत्त कर्मचारी, मयत कर्मचारी, रुग्णता सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या वारसांच्या नेमणूका उक्त परिपत्रक व शासन निर्णयाच्या आधारे करण्यांत आलेल्या आहेत. तरी सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.अकंपा/१०००/प्र.क्र.२०/आठ, दि. २८/३/२००१ व मुंबई प्रांतिक

महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) नुसार १) श्रीम. कुमारीसेल्वी नित्यानंद हरिजन, २) श्रीम. राणी मदन सागवान, ३) श्रीम. शोभा मोहन चौहान यांना सफाई कामगार म्हणून रु. २५५०-५५-२६००-६०-३२०० या वेतनश्रेणीत वारसा / अनुकंपा तत्वाने महानगरपालिका सेवेत नियुक्ती देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४९ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

आपण हे अन्न पाठविणार ते बालवाडीच्या मुलांपर्यंत पोहचेल का?

**मा. सभापती :-**

अजूनपर्यंत त्या मुलांना ड्रेस मिळालेले नाहीत. त्यांच्या ड्रेसची मंजूरी होऊन सहा महिने आलेले आहेत. परंतु, त्यांना ड्रेस अजूनपर्यंत मिळालेले नाहीत.

**दामोदर संख्ये :-**

फक्त बालवाडीच्या शाळेला ड्रेस मिळालेले नाहीत.

(सन्मा. सदस्य श्री. एस्. ए. खान ह्यांनी ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

आपले शैक्षणीक वर्ष कधी चालू होणार आहे? जुनमध्ये चालू होणार आहे की अन्य महिन्यामध्ये चालू होणार आहे.

**मा. सभापती :-**

आपले शैक्षणीक वर्ष चालू व्हायला काही कारणास्तव उशीर होणार आहे.

**रतन पाटील :-**

आपले शैक्षणीक वर्ष चालू व्हायला आधीच सहा महिने उशीर झालेला आहे. सभापतीसाहेब, तुम्ही सभापती आहात म्हणून तुम्ही मला माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या.

**मा. सभापती :-**

परंतु, मला या विषयाची काहीही माहिती नाही.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आधीच पाच सहा महिने उशीर झालेला आहे. आपल्या शिक्षण क्षेत्रातील सहा महिने निघून गेलेले आहेत. आपण हे सकस आहारचे टेन्डर किती वर्षासाठी देत आहोत? ते मला सांगा.

**मोहन पाटील :-**

आता सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी या ठिकाणी चर्चा केलेली आहे. त्यांचे म्हणने आहे की, आधीच सहा महिने निघून गेलेले आहेत. परंतु, सहा महिने निघून गेलेले आहेत असे मला वाटत नाही. कारण कार्यवाहीसाठी थोडा विलंब लागतो. त्यामुळे एवढा कालावधी वाया गेला असे म्हणता येणार नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही त्या बालकांना सहा महिने कुपोषित केलेले आहे. मी तुम्हाला दाखवतो. तुम्ही माझ्याबरोबर चला.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय, हा विषय आता संपलेला आहे.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही हा विषय संपलेला आहे असे बोलता परंतु या विषयावर चर्चा व्हायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही सकस आहाराचे टेन्डर सहा महिन्यासाठी चालू केले तरी ते तुम्ही पूर्ण सहा महिने देऊ शकणार नाही. कारण आता शाळा कमीत कमी चार ते पाच महिने चालणार आहे. त्यामुळे सहा महिन्याचे टेन्डर देण्यात अर्थ नाही.

**मा. सभापती :-**

या विषयावर व्यवस्थित निर्णय झाला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

आपल्या मिटींगमध्ये जेवढे ठराव होतात, त्या ठरावांची अंमलबजावणी होत नाही. आज जे काही ठराव झालेले आहेत, त्यांची अंमलबजावणी पुढच्या मिटींगपासून चालू करा. हे सगळे ठराव कचऱ्याच्या टोपलीतच जातात असे मला वाटते. मागच्या वेळेला शाळेमध्ये कपाट नाही, घंटा नाही हा विषयसुध्दा आलेला होता.

**मोहन पाटील :-**

शाळेतील घंटा आणि कपाटाचा ठराव झालेला आहे.

**गजानन भोईर :-**

आता तो विषय जाऊ दे. परंतु, सकस आहाराचे काय?

**रतन पाटील :-**

आपण हा ठराव कशासाठी दिलेला आहे? कारण जुन महिन्यामध्ये शाळांचे शैक्षणीक वर्ष चालू होते. त्याला अनुसरुन दिवस मोजून मग टेन्डर मंजूर करायचे होते.

**मोहन पाटील :-**

एखादी निविदा मंजूर करताना त्या निविदेसाठी लागणारा कालावधी ठरविलेला असतो.

**रतन पाटील :-**

या निविदेसाठी बारा महिन्याचा कालावधी दिलेला आहे का?

**मोहन पाटील :-**

होय.

**रतन पाटील :-**

एका वर्षाचे ३६५ दिवस असतात आणि आपल्या शाळांचे वर्ष २४० दिवसांचे असते. मग तुम्ही वर्ष कसे पकडणार?

**मोहन पाटील :-**

या ठरावाची बिले दिलेली आहेत.

**रतन पाटील :-**

जर तुम्ही आतापासून सुरु करणार असाल तर तुम्हाला सहा महिन्यासाठी बिले द्यावी लागतील.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

तसे असेल तर आता सहा महिन्याची बिले द्यायची आणि नंतर सहा महिन्याची बिले द्यायची. असे करावे लागेल.

**रतन पाटील :-**

एकतर आधीच वेळ वाया गेलेली आहे. आता शाळेचे वर्ष संपण्याची वेळ आलेली आहे. आता सकस आहार द्यायला कमी वेळ आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपण जेव्हा सकस आहार देणार तेव्हा त्याचे पेमेन्ट त्याच्याप्रमाणे केले जाईल. शाळेच्या दिवसांवर किंवा शैक्षणीक वर्षाचा विचार करुन पेमेन्ट दिले जाणार नाही.

**मोहन पाटील :-**

आपण सकस आहाराचे एक वर्षाचे टेन्डर काढणार आहोत. आपण या सकस आहाराचे पेमेन्ट सकस आहाराप्रमाणे देणार आहोत. आपण एक वर्ष सकस आहार देण्याचे ठरविलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण शाळा चालू असताना जो सकस आहार देणार आहोत तेच दिवस मोजून पेमेन्ट द्यावे. सुट्टीच्या दिवसाचे पेमेन्ट देऊ नये.

**रतन पाटील :-**

माझेसुध्दा तेच म्हणने आहे. साहेब, मागच्या वेळेला जो ठेका दिलेला होता, त्या ठेकेदाराची बेसीक रक्कम देणे बाकी होते. तसेच, या सकस आहारावर देखरेख करण्यासाठी एक चांगला अधिकारी नेमावा असे आमचे म्हणणे आहे.

**प्रकरण क्र. १४९ :-**

महानगरपालिकेच्या बालवाड्यामधील विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी सकस आहार पुरवठा करणे कामी आलेल्या दरपत्रकास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १५३ :-**

महानगरपालिकेने दि. ३०/०२/२००५ च्या आदेशानुसार ''मुंबई संध्या'' व ''वृत्तमानस'' या वर्तमानपत्रामध्ये दि. ०३/१०/२००५ रोजीच्या जाहिरातीनुसार सकस आहार पुरविणे कामी खालीलप्रमाणे दरपत्रके आलेली आहेत.

| अ. क्र. | तपशिल | भाविक कॅटरर्स | मयुरी हॉटेल | चंद्रीका सेल्स | अल्पेश व्होर | हरीओम कॅटरर्स |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मोड आलेली कडधान्ये (मसाल्यामध्ये तयार केलेली) | ३.१८ | ७.१० | ७.०० | ७.१० | ८.५० |

| अ. क्र. | तपशिल | भाविक कॅटरर्स | मयुरी हॉटेल | चंद्रीका सेल्स | अल्पेश व्होर | हरीओम कॅटरर्स |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | शेंगदाणे व गूळ | ५.३० | १०.५० | १०.५० | १०.२० | ११.९० |
| ३. | फुटाणे | ३.५५ | ५.९९ | ६.२० | ७.०० | ८.१० |
| ४. | बिस्किट (नाचणी व सोयाबीन) | ५.३५ | ९.०० | ७.७५ | ८.०० | ९.२० |
| ५. | अंडी (उकडलेली) | २.४५ | ४.९० | ४.६० | ४.४० | ५.०० |
| ६. | केळी | २.४५ | ३.८० | ४.०० | ४.२० | ५.१० |
| | **एकूण** | **२२.२८** | **४१.२९** | **४०.०५** | **४०.९०** | **४७.७०** |

विकास कामाबाबत बाजारामध्ये तपासणी केली असता सदर दर वाजवी वाटतात मे. भाविक कॅटरर्स यांचे दर वाहतूक व इतर खर्च पकडून एका विद्यार्थ्यामागे रु. ३.७१ प्रमाणे आहे. तरी मे. भाविक कॅटरर्स यांची निविदा स्विकारण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- ॲड. श्री. एस. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५० चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. एस्. ए. खान ह्यांनी ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**ज्युडी डिसोझा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

जर हे सामान एखाद्या सन्मा. सदस्याने भाड्याने मागितले तर तुम्ही ते सामान त्याला भाड्याने देणार का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

होय.

**प्रकरण क्र. १५० :-**

अग्निशमन दलासाठी साधन सामग्री व भांडारे खरेदी करणे कामी आलेल्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १५४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी लागणारे साधन, सामग्री व भांडारे खरेदी करणेकामी मा. महासभेने दि. १७/८/२००५ ठराव क्र. ३४ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यास अनुसरुन दि. ७/९/०५ रोजी 'दै. मुंबई सकाळ' व 'मुंबई संध्या' या वृत्तपत्रात जाहिर निविदा सुचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यास अनुसरुन सदरकामी एकुण ४ निविदा मुदतीत प्राप्त झाल्या असून त्यांचे दरांच्या वाटाघाटी नंतरच्या सर्वात कमी निविदेचा तुलनात्मक तक्त खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | तपशील | मे. युनिकेअर एमरजन्सी प्रा.लि | मे. जोजफ लिसलिव्ह डॅगर मॅनीफॅक्चरिंग प्रा.लि. | मे. वोरा इंटरप्रायझेस | मे. बाबेलाट असोशिएटस |
|---|---|---|---|---|---|
| १ | CUT - OFF SAW (Concrete and Metal Cutter) | <u>१,३०,०००/-</u> प्र.नग | १,४८,०००/- प्र. नग | १,४२,२००/- प्र.नग | १,४१,०००/- प्र. नग |
| २ | PORTABLE PUMP - I | १,९५,४००/- प्र.नग | १,९२,०००/- प्र. नग | १,९०,२००/- प्र.नग | <u>१,८०,०००/-</u> प्र. नग |
| | PORTABLE PUMP - II | - | - | - | - |
| ३ | होज ब्रँचेस (नोझल) Hose Branches (Nozzle) | <u>८९,०००/-</u> प्र. नग | ९५,०००/- प्र. नग | ९४,०००/- प्र. नग | ९८,०००/- प्र.नग |
| ४ | लिक्वीड फोम कंम्पाउड (प्राटीन बेस) | १५१/- प्र.लि. | १५२/- प्र.लि. | <u>१३०/- प्र.लि.</u> | १८०/- प्र.लि. |
| ५ | होज रॅम्प Hose Ramp | - | - | - | - |

| अ. क्र. | तपशील | मे. युनिकेअर एमरजन्सी प्रा.लि | मे. जोजफ लिसलिव्ह डॅगर मॅनीफॅक्चरिंग प्रा.लि. | मे. वोरा इंटरप्रायझेस | मे. बाबेलाट असोशिएटस |
|---|---|---|---|---|---|
| ६ | होज विथ कम्लींग Cm (f) ISI Mark | ८,१००/- प्र. नग | ८,१८०/- प्र. नग | ७,९००/- प्र. नग | ८,३००/- प्र.नग |
| ७ | बोट<br>१) साधी | २,१०,०००/- प्र. नग | २,३५,०००/- प्र. नग | १,९४,५००/- प्र. नग | २,०५,०००/- प्र.नग |
| | २) इंजिनसहित | ३,१०,०००/- प्र. नग | ३,३५,०००/- प्र. नग | २,९४,५००/- प्र. नग | ३,०६,०००/- प्र.नग |
| ८ | कॉमप्रेसर इमरब्रिदींग ॲपरेटर्स (B.A. Set) | ८१,०००/- प्र. नग | ७७,२००/- प्र. नग | ७९,०००/- प्र. नग | ८२,४००/- प्र.नग |
| ९ | अ) लॅडरशिडी ३५ फुट | ७३,०००/- प्र. नग | ७४,५००/- प्र. नग | ६९,९९५/- प्र. नग | ७२,०००/- प्र.नग |
| | ब) कॉटन वेस्ट १ किलो | ५४.५०/- प्र.कि. | ५७/- प्र.कि. | ५३/- प्र.कि. | ५७/- प्र.कि. |
| | क) व्हीम पावडर १०० ग्रॅम | ५३/- प्र.कि. | ५४/- प्र.कि. | ५०/- प्र.कि. | ७/- प्र. १०० ग्रॅम |
| | ड) ब्रासो डब्या १ नग(५०००मिली) | १६९/- प्र. नग | १७०/- प्र. नग | १६२/- प्र. नग | १७२/- प्र.नग |
| | इ) होज रॅबीट १ किलो | ७००/- प्र.कि. | ७०५/- प्र.कि. | ६७२/- प्र.कि. | ६९४/- प्र.कि. |
| | ई) जम्पिंग सीट १ | १४,०००/- प्र. नग | १४,७००/- प्र. नग | १०,९५०/- प्र. नग | १२,०००/- प्र.नग |
| | ड) कॉपर वायर १ किलो (१८ गेज) | ६२०/- प्र.कि. | ७४०/- प्र.कि. | ५२०/- प्र.कि. | ५६०/- प्र.कि. |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व ३ करिता मे. युनिकेअर एमरजन्सी प्रा.लि. यांचे व अ.क्र. ८ साठी मे. जोजफ लिसलिव्ह डॅगर, मॅनीफॅक्चरींग प्रा. लि. यांचे व अ.क्र. ४ व ६ व ७ व ९ करिता मे. वोरा इंटरप्राईजेस यांचे व अ.क्र. २ करिता मे. बाबोलाट असोशिएटस यांचे वरील प्रमाणे दर सर्वात कमी व वाजवी असून सर्व करासह आहेत. सर्वात कमी दराच्या निविदा स्विाकरण्यास मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे. तरी या कामी येणाऱ्या खर्चास व निविदेस मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**सुचक :- ॲड. श्री. एस. ए. खान.** **अनुमोदन :- श्रीम. ज्युडी डिसोझा.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १५१ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय मंजूर आहे.

**गजानन भोईर :-**

आता मा. आयुक्त साहेब, या ठिकाणी आलेले आहेत. म्हणून मी विचारु इच्छितो की, आपण मागच्या वेळेला एक विषय मांडलेला होता की, शाळेचे मैदान सुट्टीच्या दिवशी भाड्याने द्यायचे ठरविले होते. तसा ठरावदेखील झालेला होता. आता ह्या शाळा थोडे दिवस चालू राहणार आहेत. कारण आता परिक्षांची वेळ जवळ आलेली आहे. हे मैदान भाड्याने दिले तर प्रभाग अधिकारी बोलतात त्यांचे त्याच्यावर सिग्नेचर नाही हे योग्य आहे का? आपण ते मैदान भाड्याने दिल्याने शाळेचे नुकसान होणार आहे. त्या लोकांना मैदान भाड्याने दिले तरी तिथे मंडप लावणे, उचलणे यात वेळ जाणार आहे.

**मोहन पाटील :-**

याबाबतीत स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे. ठराव क्र. ११७ अन्वये तुम्ही त्याला मंजूरी दिलेली आहे. रु. १००/- प्रति स्टॉलप्रमाणे मंजूरी दिलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

**गजानन भोईर :-**

हे मैदान सध्या भाड्याने द्यायचे असा उल्लेख केलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण हे मैदान सध्या खाजगी संस्थेचे सांस्कृतीक कार्यक्रम असतील तरच भाड्याने देऊया. आपण जो ठराव केलेला आहे. त्याची योग्यप्रकारे अंमलबजावणी करुया.

**गजानन भोईर :-**

या मैदानाबाबत तेथील लोकांच्या तक्रारी आलेल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

परंतु, आपण ठरावाप्रमाणे कार्यवाही करीत आहोत.

**गजानन भोईर :-**

आपण नवघर शाळेचे मैदान सुट्टीच्या दिवसात भाड्याने देण्याचा विषय मांडलेला आहे.

**जयंत पाटील :-**

नवघर शाळेच्या मैदानाचा विषय महत्वाचा आहे. कारण ह्या कार्यक्रमामध्ये चक्र लावले जातात, झुले लावले जातात. त्यामुळे या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांच्या सारख्या-सारख्या तक्रारी असतात. इथे राहणाऱ्या झोपडपट्टीतील लोकांच्या तक्रारी असतात. या जत्रेमध्ये मोठमोठे इंजिन लावले जातात. या प्रभागाच्या तीन नगरसेवकांना नेहमी नागरिकांच्या तक्रारी ऐकाव्या लागतात. भाईंदर (पूर्व) ला कोणाच्याही प्रभागात मैदान नाही का? कारण आम्ही त्या मैदानाबाबत लेखी वॉर्निंग देऊनसुध्दा लोक त्या मैदानाचा वापर करतात. रात्री आठ-दहा वाजता मुले ट्युशन वगैरे करुन घरी येतात. जर या मैदानाबाबत नागरिकांच्या तक्रारी आल्या तर ते मैदान भाड्याने दृयायचे डायरेक्ट रद्द केले जाईल. त्यामुळे तुम्ही कुठे प्राधान्य द्यायचे आहे ते तुम्हीच ठरवा. आम्ही एस.पी. साहेबांना सांगुन चक्र बंद करायला लावले होते. त्याच्यानंतर दोन दिवसांनी ते चक्र उचलले. आपण मैदान भाड्याने द्यायला प्राधान्य द्यायचे की नाही ते महापालिका ठरविणार आहे. परंतु, नवघर शाळेचे मैदान सुट्टीच्या दिवसात भाड्याने द्यावे असे माझे म्हणने आहे. शिवाय, त्या मैदानात चक्र लावायला माझा विरोध आहे.

**गजानन भोईर :-**

त्या मैदानात पाच पदरी चक्र चालते.

**जयंत पाटील :-**

त्या शाळेच्या मैदानात मुले खेळतात. आमचा मुलांना खेळण्यासाठी विरोध नाही. परंतु, आपण एवढा खर्च करुन हे मैदान व्यवस्थित बनविले, त्या मैदानात चक्र लागते, झुले लागतात त्याला तेथील लोकांचासुध्दा विरोध आहे.

**मोहन पाटील :-**

आताच मा. आयुक्त साहेबांनी माहिती दिलेली आहे. प्रशासनाने मिळून निर्णय घेणे आवश्यक आहे. शाळेला लागून असलेले मैदान हे शाळेचे आवार असते.तुम्ही हा ठराव करण्यापूर्वी या विषयाचा ठराव पुन्हा एकदा घेऊन या. शाळेला लागून जे मैदान असते त्याला शाळेचे मैदान बोलतात. सुभाषचंद्र बोस मैदान हे शाळेला लागून आहे. परंतु, नवघर शाळेचे मैदान त्या शाळेला लागून नाही. ते मैदान शाळेच्या वरच्या बाजूला आहे. तुम्ही या मैदानाबाबतचा ठराव पुढच्या वेळेला घेऊन या. त्या ठरावात जी काही दुरुस्ती सुचवायची असेल त्या दुरुस्तीसह तुम्ही ठराव घेऊन या.

**गजानन भोईर :-**

आता त्या मैदानाला दिलेली परमिशन रद्द करायची का?

**मोहन पाटील :-**

आपण त्या मैदानाला परवानगी दिलेली आहे. त्यामुळे ती परवानगी रद्द करुन चालणार नाही.

**गजानन भोईर :-**

आपण ते मैदान भाड्याने देण्याबाबत अटी टाकलेल्या आहेत. तुम्ही त्या अटीशर्ती काढून टाका आणि मैदानाला परमिशन द्या.

**मोहन पाटील :-**

त्या मैदानात असे चक्र वगैरे लावले जातात. त्यासाठी प्रशासनाने त्या संस्थेला बोलवावे आणि चक्र न लावण्याची ताकीद द्यावी.

**जयंत पाटील :-**

त्या मैदानाला चक्र लावतात, त्याचा तेथील रहिवाश्यांना त्रास होतो. त्या चक्राचा प्रचंड आवाज येतो आणि प्रदुषणसुध्दा निर्माण होते.

**गजानन भोईर :-**

सकाळी जवळजवळ शंभर लोक मॉर्निंग वॉकसाठी जात असतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

समाजमंदिर लोकांसाठी भाड्याने देण्याबाबतचा विषयसुध्दा महत्वाचा आहे. माझ्या भागात समाजमंदिरचे रु. २५०/- भाडे दिले जाते. आपण त्यावेळेला लाईट, पाणी वगैरे फ्री मध्ये देतो. आपण ते

समाजमंदिर रु. २५० च्या भाड्याने देतो. परंतु, आपल्याला त्याच्यापेक्षा जास्त खर्च होतो. आमच्या एरियामध्ये मिडलक्लास फॅमिली आहेत. ती लोक पाच-पाच हॉल लग्नासाठी बुक करतात. त्या रु. २५०/- मध्ये शंभर लोकांची व्यवस्था केली जाते. जर एखादे हॉटेल बुक केले तर हा खर्च बराच वाढतो. परंतु, कधी-कधी हे समाजमंदिर धार्मिक कामासाठी भाड्याने मिळत नाही अशी परिस्थितीसुध्दा असते.

**ग्रिटा फॅरो :-**

साहेब, आपण याच्यामध्ये सुधारणाकेली पाहिजे.

**रतन पाटील :-**

साहेब, रु. २५०/- हे शैक्षणिक आणि धार्मिक कामासाठी योग्य आहेत. परंतु, समाजमंदिर हॉल लग्नासाठी भाड्याने देताना त्याचे भाडे वाढवावे.

**मोहन पाटील :-**

समाजमंदिर हॉल खाजगी कामासाठी भाड्याने देताना त्याच्या भाड्यामध्ये वाढ करावी. सोसायटी रजिस्ट्रेशन असेल तर त्याच्यासाठी भाडे वाढवावे.

**मा. आयुक्त :-**

या विषयाशी संबंधित जे अधिकारी असतील त्यांच्याकडून याबातचा प्रस्ताव आणला जाईल आणि हा विषय पुढच्या मिटींगला ठेवण्यात येईल.

**रतन पाटील :-**

साहेब, कॅन्टीनच्या विषयाचे काय केले? कारण याच्यामुळे तुमच्या मिरा भाईंदरचे उत्पन्न अडकून पडलेले आहे, कमी झालेले आहे. तुम्ही याबाबत कायपुर्तता केली?

**मोहन पाटील :-**

आपण तो विषय नंतर घेणारच आहोत.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही लक्ष द्या नाहीतर महानगरपालिकेचे उप्तन्न बुडेल.महापालिकेचे महिन्याचे रु. १० हजार बुडतात. उलट हा खर्च वाढत आहे. सन्मा. सदस्य मोहन पाटील तुमच्या माहितीसाठी सांगतो की, हा तुमच्या वेळेला झालेला ठराव आहे.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला कायद्यामध्ये अधिकार आहेत. म्हणून आपण त्याचा वापर करु अशातला भाग नाही. परंतु, आपण इमर्जन्सीसाठी घेऊ.

**रतन पाटील :-**

सुचना घेण्यात याव्यात.

**गजानन भोईर :-**

जर आपण वाट बघत राहीलो तर महानगरपालिकेचे नुकसान होईल.

**मा. आयुक्त :-**

जरी हा निर्णय स्थायी समितीने घेतला असेल तरी तुम्ही या निर्णयाप्रमाणे नागरिकांना सांगा. स्थायी समितीला कायद्याने जे अधिकार प्राप्त होणार आहेत. त्या कायद्याच्या अधिकाराच्या चौकटीत राहून स्थायी समितीने निर्णय घ्यायचा आहे आणि त्या निर्णयाची अंमलबजावणी करायची आहे. परंतु, स्थायी समितीला अशा प्रकारे निगोशिएशन करण्याचे अधिकार नाहीत. निगोशिएशन करण्याचे अधिकार कायद्याच्या तरतुदीप्रमाणे फक्त मा. आयुक्त साहेबांना आहेत. त्यामुळे आपण हा जो रु. ३०/- चा जो ठराव दिलेला आहे त्याच्यामध्ये रु. १/- ची वाढ करुन आपण त्याला देण्याचे सुचित केलेले आहे. हे कायदेशीर होत नाही किंवा हे कायद्याच्या चौकटीत बसत नाही. म्हणून आम्ही या बाबतीमध्ये शासनाकडेसुध्दा पत्रव्यवहार केलेला आहे आणि याबाबतीमध्ये शासनाकडून मार्गदर्शन मागितलेले आहे. याबाबतीमध्ये शासनाकडून मार्गदर्शन आले की त्याच्यावर कार्यवाही केली जाईल.

**गजानन भोईर :-**

साहेब, आपण आधी टेन्डर काढू शकत नाही का?

**मा. आयुक्त :-**

आपण शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला असल्यामुळे आपण त्यांच्याकडून येणाऱ्या उत्तराची वाट बघुया. त्यांच्याकडून उत्तर आले म्हणजे आपण कार्यवाही करुया. कारण आपल्याला त्याबाबत काय्रवाही करावी लागणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, माझा असा प्रश्न आहे की, आपण टॅक्स वगैरे भरतो. आपण सध्या टॅक्सच्या पावत्या कॉम्प्युटरवर बनवतो. माझ्या प्रभागातील एक टॅक्स पावतीवरील नांव सन २००३ मध्ये ट्रान्सफर केलेले होते. परंतु, अजूनपर्यंत जसेच्यातसे पूर्वीचेच नांव आहे. आपण त्याचे पैसे भरले. रु. ५००/- ची पावतीसुध्दा फाडली. परंतु, आता दोन वर्षे होऊनसुध्दा त्याच नावाने पावती येते. म्हणजेच टॅक्सची पावती पूर्वीच्याच नावाने येते. त्याचे काय कारण आहे? नाव चेंज व्हायला दोन-दोन वर्षे लागतात.

**मा. आयुक्त :-**

तुमचा मुद्दा नावामध्ये बदल करण्याचा आहे का?

**प्रेमनाथ पाटील :-**

माझा मुद्दा नावामध्ये बदल करण्याचा आहे.

**मा. आयुक्त :-**

मी याबाबतीमध्ये असा खुलासा करु इच्छितो की, आपण आता जी संगणक प्रणाली सुरु केलेली आहे, ती संगणक प्रणाली मागच्या वर्षी कार्यान्वीत होऊ शकली नाही. परंतु, त्याच्यामध्ये ज्या काही त्रुटी किंवा कमतरता होत्या. आपण त्या कमतरता दुर करुन आपण ह्यावर्षी जवळजवळ ८० ते ८५ टक्के बिलांचे वाटप केलेले आहे. आपण हा प्रयोग पहिल्यांदा करीत असल्यामुळे ह्याच्यामध्ये थोड्याशा त्रुट्या राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

ही सिस्टीम गेल्यावर्षी होती.

**मा. आयुक्त :-**

अशा ज्या काही काम्प्युटरवरील चुका निदर्शनास आल्या आणि आपण या ठिकाणी ज्या चुका लक्षात आणून दिल्या तर त्या चुकांची तातडीने दुरुस्ती केली जाईल. जेणेकरुन पुढच्या वर्षी अशाप्रकारच्या त्रुट्या राहणार नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. माशाळकर साहेब जाऊन पाच-सहा महिने झालेले आहेत. आता त्यांच्या जागेवर कोण आलेले आहे?

**केशव घरत :-**

श्री. माशाळकर साहेब जाऊन पाच-सहा महिने झालेले आहेत. आता त्यांच्या जागेवर कोणाची नेमणूक झालेली आहे.

**मा. आयुक्त :-**

अजूनपर्यंत श्री. माशाळकर साहेबांच्या जागेवर कोणाची नेमणूक झालेली नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या जागेवर कोणाचीही नेमणूक न झाल्यामुळे असे प्रसंग निर्माण होतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

सध्या आपल्याकडे सॉफ्टवेअर इंजिनियरसुध्दा नाहीत.

**गजानन भोईर :-**

आपण जे सॉफ्टवेअर आणले तेसुध्दा परिपूर्ण नाहीत.

**मा. सभापती :-**

या ठरावात कायमस्वरुपी असे नमुद केलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

ठरावामध्ये तात्पूरत्या स्वरुपात असे नमुद करायला पाहिजे होते. तर कायमस्वरुपी असे नमुद केलेले आहे.

**एस. ए. खान :-**

तुम्ही हा विषय पुढच्या वेळेला आणा.

**मा. आयुक्त :-**

आपण या संदर्भात शासनाकडे जो प्रस्ताव मंजूर करुन पाठवलेला आहे, त्याबाबतची पदे मंजूर झाल्यानंतर आपण त्यांना ऑलरेडी घेणार आहोत.

**केशव घरत :-**

पदे मंजूर होता होता अजून पाच सहा महिने जातील.

**मा. आयुक्त :-**

आपण याबाबतची तरतुद करीत आहोत.

**गजानन भोईर :-**

दिवाळीच्या आसपास आम्हाला डिमांड दिली तर बरे होईल असे लोकांचे म्हणने आहे. त्याप्रमाणे पैसे दिले जातील.

**मा. आयुक्त :-**

माझ्या माहितीप्रमाणे आपण मागच्या वर्षीपेक्षा या वर्षी एक महिना लवकर बिले दिलेली आहेत.

**एस. ए. खान :-**

ही जी बिले दिलेली आहेत, त्याच्यामध्येसुध्दा चुक झालेली आहे. त्याच्यामध्ये नोटीस चार्जेस लावलेले आहेत. मागच्या वेळेला ज्या लोकांनी अगोदर बिले भरलेली आहेत त्यांना नोटीस चार्जेस परत लावण्यात आलेले आहेत. अशी चुक मागच्या वेळेलासुध्दा झालेली होती. ज्या नागरिकांनी सांगितले की, आम्ही वेळेवर

बिले भरली आहेत त्यांना माफ करा. तुम्ही त्या लोकांना सवलत द्या. तुम्ही त्या लोकांचे म्हणने ऐका. मग तुम्ही त्यांचे पैसे भरा किंवा नोटीस फी भरा.

**मा. आयुक्त :-**

असे होणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मी श्री. विजय पाटील यांच्याकडे त्या बिलाची पावती गेल्या वर्षी दिलेली आहे.

**एस. ए. खान :-**

मागच्या वेळेलासुध्दा चर्चा झालेली होती. ह्यावेळेला नोटीस फी लावण्यात आलेली आहे. जे नागरिक सांगतात की, आम्ही मागच्या वेळेला बिल वेळेवर भरलेले आहे, त्यांचे ती लोक ऐकत नाहीत. ते सांगतात की, तुम्ही तुमचे बिल आणि पैसे भरल्याची पावती घेऊन या. ती लोक बिल जाऊन घेऊन यायचा खटाटोप करणार का? ते नागरिक सांगतात की आम्ही बिल भरलेले आहे ते ऐकून माफ करुन ताबडतोब त्यांच्याकडे द्या. जी रु. १०००/-, रु. ५००/- अशी जी अमाऊन्ट असेल ती घ्या. आपण त्या व्यक्तीला रु. १४/- रु. १५/- साठी परत पाठवायचे आणि बिल टाईमवर भरलेले आहे की नाही हे बघायला तुमचे बिल घेऊन या असे सांगायचे म्हणजे ती आपली चुक आहे. त्याच्यासाठी नागरिकांना त्रास देण्याची गरज नाही. जर नागरिकांनी सांगितले की आम्ही बिल अगोदर भरलेले होते तर तुम्ही त्यांचे ऐकून घ्या.

**मा. आयुक्त :-**

अशाप्रकारच्या चुका होणे योग्य नाही. जी बिले मालमत्ताधारकांकडे गेलेली आहेत आणि मालमत्ताधारकांनी वेळीच महानगरपालिकेकडे पैसे भरलेले असतील आणि त्यांना पुन्हा चुकीच्या पध्दतीने नोटीसा दिलेल्या असतील तर ती नोटीस फी रद्द केली जाईल आणि जर पुन्हा अशा प्रकारच्या तक्रारी आल्या तर तुम्ही आमच्या निदर्शनास आणून द्या. त्याच्यावर तातडीने कार्यवाही केली जाईल.

**एस. ए. खान :-**

जर तुम्हाला नागरिकांनी बिल भरलेले असल्याचे सांगितले तर तुम्ही त्यांचे ऐकूण घ्या. त्याच्यावर ताबडतोब नोटीस लावलेली आहे. त्याच्यासमोर कमी करुन द्या.

**मा. आयुक्त :-**

याची तातडीने दखल घेण्यात येईल.

**केशव घरत :-**

साहेब, माझा असा प्रश्न आहे की, उत्तनपासून मुर्ध्यापर्यंत जी गावे आहेत, शिवाय आमच्याकडे चेणा, वर्सोवा व काजुपाडा हे आदिवासी पाडे आहेत. त्या लोकांची जुनी घरे म्हणजे काही कुडाची घरे आहेत. वर पत्रे आहेत. आमच्याकडे ती सगळी लोक आलेली होती. त्या घरांना रु. १.२०/- ने कर आकारणी केलेली आहे. पहिल्यांदा ६० पैशाने केलेली कर आकारणी योग्य होती. त्याच्यानंतरच्या मधल्या पिरियडला घोडबंदरपासून तिकडचे जे पाडे आहेत, त्यांना गाळून शहरातील जी नविन कर आकारणी आहे तीच लावलेली आहे. ही अशी तफावत का?

**मा. आयुक्त :-**

मी याबाबत असा खुलासा करु इच्छितो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये नगरपालिका असतांना टाऊन प्लानिंग डिपार्टमेन्ट जे काही झोनिंग ठरवून दिलेले होते आपण त्या झोनिंगप्रमाणे असेसमेन्ट त्या दराने आणि त्या पध्दतीने करीत आहोत. शहराचे जे काही चार भाग केलेले आहेत, ह्या भागात आपण जो भाग सांगता तो भाग पर्टीक्युलर रु. १.२०/- मध्ये येत असेल तर त्याच्यावर रु. १.२०/- प्रमाणेच असेसमेन्ट होणार आहे.

**केशव घरत :-**

रु. १६००/- पर्यंत कर आकारणी झालेली आहे आणि त्या लोकांची ते पैसे भरण्याची ऐपत नाही.

**मा. आयुक्त :-**

ऐपत आणि मालमत्ता कर लावणे हे एकरुप होऊ शकत नाही.

**केशव घरत :-**

शेवटी ते संपूर्ण आदिवासी पाडे आहेत. आपण त्यांना वर्षभर रु. १६००/- भरायला सांगितले तर ते भरु शकत नाहीत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

टाऊन प्लानिंगने जे झोनिंग केलेले आहे. आपण ते रिव्हाईस किंवा चेंज करु शकतो का?

**मा. आयुक्त :-**

आपल्याला ते टाऊन प्लानिंग डिपार्टमेन्टकडून निश्चित करुन घ्यावे लागेल.

**केशव घरत :-**

तुम्ही तिकडच्या विभागांना कुठला निकष लावला तेच कळत नाही.

**मा. आयुक्त :-**

पूर्वी नगरपालिका असताना या पद्धतीप्रमाणे असेसमेन्ट झालेले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे त्यांना रु. १.२०/- प्रमाणे ऑलरेडी बिले गेली असतील.

**केशव घरत :-**

ती बिले त्यांच्याकडे गेलेली नाहीत. म्हणून ते आमच्याकडे आलेले होते आणि मी तुम्हाला याच्यासाठी हे सांगत आहे. जर त्यांची बिले भरण्याची ऐपत नसेल तर आम्ही शेवटी काय करणार?

**मा. आयुक्त :-**

बिल भरण्याची ऐपत असण्याचा प्रश्न येत नाही. परंतु, रु. १.२०/- प्रमाणे किती टॅक्स होणार ते सांगा.

**केशव घरत :-**

आता ३६०स्क्वेअर फुट जागा आहे आणि त्या लोकांना रु. १६९०/- वर्षाची घरपट्टी आहे. त्याच्यामध्ये टॅक्स, शिक्षण कर वगेरे सगळे आले. त्या लोकांनी रु. १६९०/- कुठून भरायचे?

**मा. आयुक्त :-**

मी याबाबतीमध्ये तुमच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, ऑलरेडी जे टॅक्स लागलेले आहेत किंवा टाऊन प्लानिंग डिपर्टमेन्टने जे झोनिंग ठरवलेले आहे. त्या झोनिंगप्रमाणे जो टॅक्स ऑलरेडी लावलेला आहे, आपल्याला त्याच्यामध्ये पुन्हा बदल करुन कमी करता येणार नाही.

**केशव घरत :-**

आपण हा विषय महासभेत घेतला तर बरे होईल.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, बिल कधी काढलेले आहे?

**मा. आयुक्त :-**

आपल्याला सन्मा. सदस्य जे निदर्शनास आणून देत आहेत, त्याप्रमाणे कोणी पैसे भरले किंवा त्यांना एखादी चुकीची नोटीस इश्यु झालेली असेल म्हणजेच त्यांची जी नोटीस फी लागलेली असेल तर आपल्याला ती फी कमी करण्याचे अधिकार आहेत. आपण ती नोटीस फी त्याक्षणी कमी करुन देऊ.

**केशव घरत :-**

साहेब, आपण हा विषय महासभेत घेतला तर बरे होईल.

**मा. आयुक्त :-**

महासभेला अमर्याद मर्यादा आहेत. आम्हाला त्याच्याबद्दल काहीही बोलायचे नाही. परंतु, कायद्यामध्ये ज्या तरतुदी आहेत. आपण त्या तरतुदीप्रमाणे मालमत्ता कराची वसूली करतो. किंवा मालमत्ता कर लावतो. आपण ते डावलून काही करु शकत नाही.

**एस. ए. खान :-**

साहेब, तो जो एक विकासकर्ता आहे. त्याने अजूनपर्यंत विकास कर भरलेला नाही. त्याचे लाखो रुपयेसुध्दा बाकी आहेत आणि त्याचे काम चालू आहे. आपण त्यांच्या विरुध्द काय कार्यवाही करणार?

**मा. आयुक्त :-**

मी या संदर्भात मागच्या वेळेला आर्किटेक्ट अणि बिल्डर लोकांची दिवाळीपूर्वी मिटींग घेतलेली होती. त्याच्यामध्ये विकास कराची कोणाची किती रक्कम बाकी आहे या संदर्भात मी तक्ता तयार केलेला होता. त्याच्यापैकी बरेचसे डेव्हलपर स्वतःची प्रॉपर्टी डेव्हलप करुन इथुन निघून गेलेले आहेत. त्यांची वसूली वेळच्या वेळेला व्हायला पाहिजे होती किंवा त्यांचा पाठपुरावा वेळच्या वेळी करायला पाहिजे होता. परंतु, त्याच्यामधील ६० ते ७० टक्के विकास कराची रक्कम आपल्या महानगरपालिकेच्या कार्यालयामध्ये भरलेली आहे. जी काही उर्वरीत रक्कम आहे किंवा तुम्ही म्हणता त्याप्रमाणे त्या बिल्डरची विकास कामे चालू असतील तर ती विकास कामे तातडीने थांबवून त्यांच्याकडून रक्कम वसूल करावी लागेल.

**एस. ए. खान :-**

अशी विकास कामे चालू आहेत आणि तक्रार देऊनसुध्दा ती कामे अजूनपर्यंत थांबलेली नाहीत. नगरसेवकांनीसुध्दा तक्रार केलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

अशाप्रकारे जर कामे होत असतील तर ती कामे थांबवा आणि पैसे भरल्याशिवाय त्यांना पुढचे काम करायला देऊ नका.

**एस. ए. खान :-**

ज्या सर्वसामान्य लोकांनी रु. ५०००/- ते रु. १०,०००/- घरपट्टी भरली नाही तर अशा सर्वसामान्य लोकांविरुध्द कारवाई करतात आणि विकासकर्त्याकडून लाखो रुपये येणे बाकी आहेत तर त्यांच्यावर ही लोक कारवाई करत नाहीत, त्या विकासकर्त्याचे काम थांबवत नाहीत.

**मा. आयुक्त :-**

आपण प्रभाग अधिकाऱ्यांना अशाप्रकारच्या सुचना देऊ. आपण त्यांना यादी पाठवू. त्या यादीप्रमाणे ज्या-ज्या लोकांची कामे चालू असतील आपण ती कामे तातडीने थांबवू.

**गजानन भोईर :-**

साहेब, शाळेच्या मैदानाच्या विषयाबाबत काय रुलिंग आहे?

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती महोदयांनी शाळेच्या विषयाबाबत असे सांगितले आहे की, या विषयाबाबत पुढच्या मिटींगला दुरुस्तीचा ठराव आणला जाईल.

**जयंत पाटील :-**

त्या शाळेच्या मैदानात झुले वगैरे लावलेले आहेत. त्याचे काय?

**एस. ए. खान :-**

परंतु, शाळेचे मैदान भाड्याने देण्याबाबत परवानगी दिलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

शाळेच्या विषयावर झालेल्या चर्चेप्रमाणे तुम्ही आम्हाला जी बाब लक्षात आणून दिलेली आहे. त्याबाबतीत खरोखर अशा प्रकारचे जुगार वगैरे खेळले जात असतील तर आपण त्याच्यावर बंधन आणू. मी त्याबाबत आजच प्रत्यक्ष सुचना देतो.

**जयंत पाटील :-**

त्या मैदानात जास्त प्रमाणात झुले लावायला परवानगी देऊ नका.

**गजानन भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, एक नविन जी.आर. आलेला आहे. आपण कर्मचाऱ्यांना जे औषधाचे रु. २०,०००/- देत होतो. या नविन जी.आर. प्रमाणे त्याला ४०,०००/- केलेले आहेत. हा कर्मचाऱ्यांच्या भविष्याच्यादृष्टीने चांगला विषय आहे. मी मा. सभापतींना या विषयाबाबतचे लेटर पुढच्या मिटींगला देतो.

**मा. आयुक्त :-**

हे लेटर आमच्या प्रशासनाकडेसुध्दा आलेले असेल.

**गजानन भोईर :-**

आता लाईट नव्हती म्हणून मी लेटर टाईप करु शकलो नाही. परंतु, मी तुम्हाला लेटर टाईप करुन देईन. हा एक चांगला विषय आहे. तुम्ही पुढच्या मिटींगला हा विषय घ्या. कारण ह्या विषयामध्ये कर्मचाऱ्यांचे हित आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील विषय पेन्डीग ठेवत नाही. आम्ही कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आलेले प्रत्येक विषय तातडीने घेतो.

**गजानन भोईर :-**

यासाठी मी हे लेटर तुम्हाला देत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, असा विषय होता की, आपली जी टॅक्स पावती आहे, आपली त्याबाबतची ॲग्रीमेन्ट जोपर्यंत रजिस्टर होत नाही तोपर्यंत आपण ती टॅक्स पावती दुसऱ्याच्या नावावर करीत नाही. आपल्या भाईंदर (ईस्ट) आणि भाईंदर (वेस्ट)ला जुन्या बिल्डीग आहेत त्याची ॲग्रीमेन्ट रजिस्टर होत नाही. त्यामुळे आपल्या महापालिकेचा तोटा होतो. जर आपण स्टॅम्प ड्युटी भरली असेल आणि आपण त्या ॲग्रीमेन्टवरील टॅक्स पावती त्या नावावर चेंज केली तर आपल्या महापालिकेचे उत्पन्न वाढेल आणि आपल्या महापालिकेचा आर्थिक फायदा होईल. आपण रु. ५००/- ते रु. १०००/- पर्यंत ट्रान्सफर फी घेतो. त्याच्यामुळे आपल्या महापालिकेचे उत्पन्न वाढेल.

**मा. आयुक्त :-**

मी त्याबाबत डिपार्टमेन्टकडून माहिती घेतो आणि आपण त्याच्याप्रमाणे कार्यवाही करुया.

**कैलासबेन जानी :-**

रजिस्टर ऑफिसला रु. ५००/- च्या पावतीची किंमत नसते. ते बोलतात तुम्ही तिकडून ॲथोरिटी आणा.

**मा. आयुक्त :-**

मुद्रांक शुल्कबाबत शासनाने जे नॉर्म्स ठरवून दिलेले आहेत. त्याच्यामध्ये इमारतींना महानगरपालिकेच्या दाखल्याची गरज आहे किंवा महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेच्या दाखल्याची गरज आहे. तो दाखला कसा द्यायचा आहे ते बघा. जर त्या इमारतीला पूर्णत्वाचा दाखला दिला असेल तर त्याचे व्हेरीफिकेशन करुन त्याच्यावरुन तो दाखला द्यायचा आहे. आपल्या शहरामध्ये अशी अडचण आहे की, पूर्वी ग्रामपंचायत काळामध्ये ज्याकाही इमारती झालेल्या आहेत. त्या इमारतींना कम्प्लिशन सर्टीफिकेट वगैरे दिलेले नाही. त्यामुळे शासनाने जे धोरण ठरविलेले आहे, आपल्याला त्या धोरणाच्या विरुध्द भुमिका घेता येत नाही. ही इमारत नगरपालिकेच्या मालमत्ता रजिस्टरमध्ये ग्रामपंचायत काळापासून आहे अशा पध्दतीने आपण त्यांना दाखला दिला तर तिथे त्याचा उपयोग होत नाही. त्या दाखल्यावरुन तिथे मुद्रांक शुल्क भरले जात नाही.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, आपण तो विचार करायला पाहिजे. परंतु, आत जे गीता झेरॉक्सवाले आहेत, तुम्ही त्यांना रु. ७०००/- दिले तर ते ट्रान्सफर करुन देतात. म्हणजे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

**रतन पाटील :-**

आपल्या महानगरपालिकेचे नुकसान होते आणि त्यांचा फायदा होतो.

**मा. आयुक्त :-**

यासाठी सांगितले की, मी खात्री करुन माहिती घेतो आणि आपल्याला त्याप्रमाणे अंमलबजावणी कशी करता येईल? ते आपण बघुया.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, बरेच लोकांचे ट्रान्सफर झालेले नाहीत, ट्रान्सफर होत नाहीत. म्हणून ती लोक आमच्याकडे येतात. पैसे भरले तर त्यांचे काम होते. म्हणजे सेटींग लावली की, काम होते.

**प्रकरण क्र. १५१ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १५५ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६५ अन्वये पर्यावरण सद्य स्थिती अहवाल शासनाकडून विहीत करण्यात येईल अशा पद्धतीने ३१ जुलै पुर्वी महापालिकेने प्रदर्शित करणेत आला. सन २००५-०६ या वर्षातील पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल बनविणे कामाच्या निविदा महापालिकेने मागविल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदाकारांनी दर सादर केले आहेत.

| **निविदाकाराचे नांव** | | **निविदेत सादर केलेला दर** |
|---|---|---|
| ● अश्वमेध इंजिनिअरींग | - | रु. ९,९५,०००/- |
| ● महाबल एनव्हायरो इंजिनिअरींग | - | रु. १०,८३,०००/- |
| ● एनव्हायरो ॲनालिस्ट | - | रु. ४,५९,१००/- |
| ● स्काय लॅब | - | रु. ७,०१,२८०/- |

वरील प्रमाणे तक्त्याचे अवलोकन केले असता मे. एनव्हायरो ॲनालिस्ट यांनी सदर पर्यावरण सद्य स्थिती अहवाल बनविणे कामी सादर केलेले दर सर्वात कमी रु. ४,५९,१००/- आहे. कमी दराच्या निविदाकारास निविदेतील बाब क्र. १, ३ व ४ करीता वाटाघाटीसाठी बोलाविले असता बाब क्र. १ करीता रु. ३५००/- प्रती महिना, बाब क्र. ३ ब करीता रु. २४९०/- प्रती महिना, बाब क्र. ३ क करीता रु. २४९०/- प्रती महिना, बाब क्र. ३ ड करीता रु. २४९०/- प्रती महिना, बाब क्र. ४ करीता रु. २१००/- प्रती महिना असा दर वाटाघाटी नंतर एकुण वार्षिक रु. ४,४२,५४०/- दर सादर केला असून सदर दराची निविदा स्विकारणेंस मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे.

सदर प्रस्तावाचे मा. स्थायी समितीच्या अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आपले जे काही प्रश्न पेन्डींग होते, त्या प्रश्नांची मा. आयुक्त साहेबांनी उत्तरे दिली. त्याबाबत मी मा. आयुक्त साहेबांना सर्वांच्यावतीने धन्यवाद देतो. तुम्ही सर्वांनी आम्हाला अशाचप्रकारे सहकार्य करा अशी अपेक्षा बाळगतो. तसेच, सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांना ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानुन सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १.०० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**